MHPU180023832015

**नि. दिवाणी दावा क्र.४५०/२०१५**
उत्तम व इतर
विरुध्द
साखाराम व इतर

**<u>निशाणी क्रमांक ३७ वरील आदेश</u>**
(पारीत दिनांक ११/०२/२०२५)

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ बाबत अबेटमेंट रद्द करणेकामी दाखल केलेला आहे.

२. सदर वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.३ किसन मारुती जाधव हे दि. ०५/०१/२०१८ रोजी मयत झाले असून वादी यांना त्यांच्या वारसदारांची नावे व पत्ते माहिती नसल्याने तसेच मध्यंतरी कोविड काळ तीन वर्षाचा असल्याने त्यांचा संपर्क झाला नव्हता. तसेच वादी स्वतः हजर असल्याने त्यांना वारसांची नावे व पत्ते अभिलेखावर घेण्याकामी सहा वर्षे पाच महिन्यांचा उशिर झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी झालेला अबेटमेंट हूकूम रद्द करुन मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून वादीचा अर्ज खरा व बरोबर नसल्याचे कथन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक नसल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३ हे दि. ०५/०१/२०१८ रोजी मयत झाले आहेत. वादी यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्ठयार्थ निशाणी ४० वरील यादी सोबत प्रतिवादी क्र.३ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. सदर मृत्यूप्रमाण पत्राचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.३ हे दि. ०५/०१/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि. ०४/०९/२०२४ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. दरम्यानच्या काळात कोव्हीड काळ तीन वर्षाचा वादी

यांच्या म्हणण्यानुसार वगळला तरी देखील वादी यांना सदर कामी तीन वर्षे पाच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. परंतु, प्रस्तुतचे प्रकरण हे स्थावर मालमत्तेबाबत असल्याने वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. तसेच सदर प्रकरणात निशाणी ४१ वर दि. १८/०१/२०२५ यांनी प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ यांना अबेटमेंट रद्द करणेकामी झालेल्या विलंब माफीचा अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज हा खर्चासह मंजूर केला असल्याने प्रस्तुत अर्जावर नव्याने खर्च लादने योग्य होणार नाही. म्हणून वरील बाबींचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंट रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2025.02.12 11:06:16 +0530

दिनांक– ११/०२/२०२५.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड, जि. पुणे.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | :-Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :-(Sharad B. Kaldate) 2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :-11/02/2025. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :-11/02/2025. |
| Order/ Judgment uploaded on | :-12/02/2025. |